**प्रेसनोट दिनांक ०६/०७/२०१९**
**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**कम्युनिटी पोलीसींग व सार्वजनिक सुरक्षे अंतर्गत येरवडा पोस्ट ऑफिस कार्यालय, एअर पोर्ट रोड, पुणे येथील अधिकारी कर्मचारी यांची बैठक घेवून त्यांना मागदर्शन केले बाबत.**

---

कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही वॉच प्रकल्प) या संकल्पने अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.२९/०६/२०१९ रोजी १०:३५ वा. ते ११:३० वा.चे दरम्यान येरवडा पोस्ट ऑफिस, एअरपोर्ट रोड, पुणे येथील अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेवून त्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या. सदर बैठकीमध्ये पो.उप.निरी.श्री.माने यांनी उपस्थितांना घडणारे चोरी, घरफोडी, वाहनचोरी, फसवणूक, महिला व बालकांसंबंधी घडणारे गुन्हे यांची माहिती दिली. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच दाखल गुन्हे उघडकीस आणणेसाठी आजूबाजूला घडणारे संशयास्पद घटनांची, इसमांची माहिती पोलीसांना देऊन सहकार्य करणेबाबत आवाहन केले. तसेच पोलीस आयुक्त कार्यालयाकडून नोकरदार महिलांचे सुरक्षेकरीता राबविण्यात येणारे बडीकॉप संकल्पने बाबत माहिती दिली. त्याचबरोबर पोस्ट ऑफिसचे सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांना महिला, जेष्ठ नागरिक, बालकांचे तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नव्याने स्थापन केलेल्या भरोसा सेल बाबत तसेच पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे १४ योजनांची माहिती देऊन मार्गदर्शन केले. तसेच सीसीटीव्ही कॅमेरांचे महत्व पटवून देवून शासकीय कार्यालयात तसेच स्वतःचे राहते ठिकाणांवर सार्वजनिक रोड, परिसर कव्हर होईल अशा रितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आवाहन केल.

अशा प्रकारे श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही वॉच प्रकल्प) या संकल्पने अंतर्गत येरवडा पोस्ट ऑफिस, शास्त्रीनगर चौक, येरवडा, पुणे येथे भेट देऊन तेथील अधिकारी व कर्मचारी, महिला कर्मचारी यांची बैठक घेऊन त्यांना सुरक्षेबद्दल माहिती देऊन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.





